# फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड

(महाराष्ट्र शासकीय उपक्रम)
CIN : U45200 MH 1974 SGC 017206
पंजी. कार्या.- एफडीसीएम भवन, ३५९/B, हिंगणा रोड, अंबाझरी, नागपूर -४४००३६
Email: dmfdcmecotourism@gmail.com / dm.ecotourism@fdcm.nic.in
**दूरध्वनी क्र. ०७१२-२५३३४४२, २५३३४७५, २५५५९४१ फॅक्स २५५१६८६**

क्रमांक: विव्य / निसर्ग पर्यटन/आदेश/७६/ **१८१** / नागपूर, दिनांक : **२६.०४.२०१६**

## कार्यालयीन आदेश

प्रति,
महाव्यवस्थापक,
नागपूर प्रदेश / उत्तर चंद्रपूर प्रदेश

विषय : एफडीसीएम लि. चे निसर्ग पर्यटन संकुलात निवासाकरीता सवलत देण्याबाबत.

संदर्भ : या कार्यालयाचे पत्र क्र. विव्य/नि.प./३/६१/नागपूर, दिनांक १२.०४.२०१६.

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये, पुणे येथील ३० अनाथमुली, केअर टेकर व चालक यांचेकरीता निसर्ग पर्यटन संकुल मोहर्ली येथे निवासाकरीता ४०% सवलत देण्यात आली आहे.

सदर निणर्याच्या अनुषंगाने, एफडीसीएम लि. कडील सर्व निसर्ग पर्यटन संकुलात निवासाकरीता सोमवार ते शुक्रवार या दिवशी सामान्य शैक्षणिक संस्थांनी आयोजित केलेल्या सहलींना निश्चित केलेल्या दरपत्रकात **२०%** पर्यंत सवलत वर्षातून एकदा तसेच, अनाथ, मतीमंद किंवा त्याप्रकारच्या विद्यार्थी शैक्षणिक संस्थानी आयोजित केलेल्या सहलींना निश्चित केलेल्या दरपत्रकात **४०%** पर्यंत वर्षातून एकदा सवलत देण्यात यावी.

विद्यार्थ्यांची प्राधान्याने डॉरमिटरी मध्ये राहण्याची सोय करण्यात येईल. तसेच, त्याव्यतिरिक्त कॉटेज/सुट्स/वन विश्रामगृह तील खोलीत विद्यार्थ्यांना ४ च्या ग्रुपला प्रत्येक खोलीत समाविष्ठ करण्यात येईल. त्याकरीता, घातलेल्या जादा गाद्यांसाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. **निवासातील उपलब्ध खोल्या नुसार विद्यार्थ्यांची राहण्याची सोय केली जाईल.** शाळेच्या मुख्याध्यापिका/वर्गशिक्षक किंवा संस्था संचालक यांनी एफडीसीएम लि. कडील संबधित विभागीय कार्यालयाशी आरक्षणाकरीता संपर्क साधावा. **एफडीसीएम लि. च्या प्रत्येक निसर्ग पर्यटन संकुलात निवासात उपहारगृहाची सोय आहे. परंतु, त्यामध्ये एफडीसीएम लि. मार्फत कोणतीही सवलत असणार नाही.** शासनाच्या नियमानुसार ऐषोआराम व सेवाकर देय राहील.

**स्वा/-**
**व्यवस्थापकीय संचालक**

प्रतिलिपी : १. महाव्यवस्थापक (सर्व) / प्रादेशिक व्यवस्थापक, सांगली प्रदेश, सांगली यांना माहितीकरीता अग्रेषीत.
२. विभागीय व्यवस्थापक (सर्व), वन प्रकल्प विभाग यांना माहिती व कार्यवाहीस्तव रवाना.